तरुण भारत २० ऑक्टोबर ९७

# कमला कॉलेजमध्ये प्रमाणपत्र वितरण समारंभ

कोल्हापूर, दि. १९ – ताराराणी विद्यापीठाच्या कमला कॉलेजमध्ये सत्यशोध प्रबोध परीक्षेचा प्रमाणपत्र वितरण समारंभ नुकताच प्राचार्य क्रांतीकुमार पाटील यांच्या हस्ते पार पडला.

सातारा येथील अंधश्रद्धा निमुर्लन समितीतर्फे सत्यशोध, प्रांरभिक प्रज्ञा व प्रबोध या अंधश्रद्धा निमुर्लन अभ्यास क्रमावर परिक्षा घेण्यात आली. कमला कॉलेजमधील १२५ विद्यार्थ्यींनी या परिक्षेत उत्तीर्ण झाल्या. यावेळी बोलताना प्राचार्य म्हणाले, विज्ञाननिष्ठ जीवन म्हणजे राष्ट्राची प्रगती व अज्ञान, अंधश्रद्धा असलेला समाज कधीही प्रगती करू शकत नाही. त्यासाठी विज्ञाननिष्ठ होणे गरजेचे आहे. प्रास्ताविक व अंधश्रद्धा निर्मुलनाचा उद्देश प्रा. जे. बी. देसाई यांनी विशद केला. सूत्रसंचलन भरती शेळके यांनी केले.

२०/१०/९७